


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७१५ . वा | गुरूवार | दि. २१ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# बुलढाणा लोकसभेला उमेदवार भाजपचाच पाहिजे,नाहीतर...

## शिवसेना पक्षात मतांच विभाजन दोन ठिकाणी तर भाजपाचे एकत्रीत गठ्ठा मतदान असून सुद्धा तरी ही उमेदवार शिंदे गट सेनेचा का असा रोष भाजपा तळागळातील कार्यकर्त्यांत दिसून येत आहे









**भाग-11**

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा लोकसभा खा.प्रतापराव जाधव यांच्या उमेदवारीची अधिकृत घो-षणा आज पर्यंत झाली नाही. तरी ही जळगाव जामोदचे भाजपा आमदार संजय कुटे यांनी अतिउत्सात ट्विटरवर वर प्रतापरावांची उमेदवारी फायनल म्हणून सांगितले. मोदींसाठी सेनेचा उमेदवार निवडून आणू म्हणाले.त्या विरुद्ध मोठ्याप्रमाणात जिल्ह्यातील मोदी प्रेमी मतदार म्हणतात मोदी से बैर नहीं , प्रतापराव तेरी खैर नहीं.एवढा असंतोष प्रस्थापित खासदारा विरुद्ध मतदार संघात दिसून येते आहे.भाजप ३७०+ आहे.४०० पार आहे.भाजपच्या उमेदवाराची हमी घ्या.भाजपचे जिल्ह्यातील प्रस्थापित नेते जिल्ह्यातून सलग तीन वेळा देशाचे नेतृत्व करणारे पंतप्रधान मोदी यांच्या नावांनी मते मागणाऱ्या खासदार ला विजयी करण्याची हमी घेतात तर मग भाजपचाच उमेदवार द्या. हा मतदारसंघ भाजपचाच आहे भाजप चा प्रभाव आहे. अशी जोरकसपणे मागणी का करत नाही. बहुचर्चित लांगुलचालन का करतात. असा संतप्त सवाल जिल्ह्यातील मोदी प्रेमी मतदार करीत आहे. देशातील अनेक मतदारसंघात त्या त्या पक्षाचे नेते, आमदार आप आपल्या पक्षासाठी आग्रही मागणी करताना दिसतात. उमेदवार बदला म्हणून दबाव वाढवतात. हे आपण रोज पहातो. वाचतो. तसा बुलंद आवाज आपल्या हक्काचा बुलडाणा जिल्हा भाजपला उमेदवारी जाहीर होण्यासाठी केलाच पाहिजे. तरच जिल्ह्यात कमळ फुलू शकते.अजून वेळ गेलेली नाही. कारण उमेदवारी जाहिर झाली नाही.एक धक्का और दो और कमल का द्वार खोल दो..हाच मतदार राजाचा मानस आहे.सहकार महर्षी विकास पुरूष बुलडाणा अर्बन परिवार सर्वोसर्वा राधेश्याम चांडक




उर्फ भाईजी व भाजप नेते माजी आमदार विजयराज शिंदे असे प्रभावी उमेदवार भाजप जवळ आहेत हे ही लक्षात घ्यावे **भाजप पक्षश्रेष्ठींने उघडा डोळे बघा नीट प्रयत्न केला तर हे सहज शक्य आहे**

---

# खंडणी, मुरूमाचे अवैध उत्खननाच्या कारणावरून दोन गटात हाणामारी...

## कोथळी येथील घटना : परस्परविरोधी तक्रारी, १८ जणांवर गुन्हे

**जनसंचलन/मोताळा**

मोताळा कि कथित स्तरावर जेसीबी ५ चालविण्यासाठी द्यावा लागणारा हप्ता व तसेच अवैध मुरुमाच्या वाहतुकीवर छापा टाकण्यासाठी महसूल पथकाला र बोलवल्याच्या संशयावरून दोन गटात २० मार्च रोजी सकाळी हाणामारी प झाल्याची घटना तालुक्यातील मोताळा येथे सकाळी घडली. याप्रकरणी दोन्ही न गटांच्या परस्पर विरोधी तक्रारीवरून बोराखेडी पोलिसांनी १८ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. कोथळी येथील आरीफ खान ने अहेमद खान यांनी बोराखेडी पोलिसात . दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्याकडे र असलेल्या जेसीबीमध्ये शे. इरफान शे. प हाशम आणी अ. जमील अ. रशीद हे भागीदार आहेत. १९ मार्च रोजी सकाळी सय्यद युसूफ सय्यद मुसा आणी कुर्बान न शाह मिस्कीन शाह या दोघांनी आरीफ खान आणि साक्षीदारांना जेसीबी नाही चालवायची असेल तर हप्ता देण्याचे म्हटले होते. अन्यथा जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची धमकी दिली होती. २० मार्च रोजी सकाळी सय्यद युसूफ सय्यद मुसा, कुर्बान शाह मिस्कीन शाह, मिस्कीन शाह हैदर शाह, तसलीम शाह मिस्कीन शाह, आरीफ शाह मिस्कीन शाह आणी सय्यद समीर सय्यद युसूफ या सहा जणांनी गैर कायद्याची मंडळी जमवून अ. जमील अ. रशीद यांना मारहाण केली. मध्यस्थीसाठी गेलेल्यांना ही त्यांनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यावरून पोलिसांनी उपरोक्त सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या गटाती १२ जणांविरोधात गुन्हा दुसऱ्या गटातील कोथळी येथील कुर्बान शाह मिस्कीन शाह यांनीही पोलिसात तक्रार दिली.शे. इरफान शे. हाशम, आरीफ खान अहेमद खान, शे. जमील शे. रशीद यांच्याकडे जेसीबी असून ते रात्री सरकारी जमिनीतून जेसीबीने मुरुमाचा उपसा करून विक्री करतात. १९ मार्च रोजी रात्री मोताळा तहसील कार्यालयाचे पथक आल्याने नमूद आरोपींनी त्यांचे जेसीबी आणी ट्रॅक्टर घेऊन पळ काढला होता. तहसील कार्यालयाचे



पथक फिर्यादी व साक्षीदार यांनी पाठविले असे वाटल्याने आरीफ खान अहमद खान, शे. जमील शे. रशीद, शे. इरफान शे. हाशम, शे. करीम शे. रशीद, शे. रशीद शे. गणी, शे. नईम शे. रशीद, नाशीर खान नसीम खान व अन्य काहींनी यांनी तक्रारदार व सहकाऱ्यांवर राग धरून २० मार्चरोजीशे.जमीलशे.रशीदयानेफोनकरूनसय्यदयुसूफयांनाकोथळीयेथे बोलावले व मारहाण केली. प्रकरणी १२ जणांविरोधात गुन्हो दाखल झाले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उद्धव ठाकरे यांचा नरेंद्र मोदी आणि अमित शहा वर घनाघात समाचार...

# उद्धव ठाकरेंचा प्रतापराव जाधव यांना टोला गद्दार खासदाराच डिपॉझिट जप्त करून दाखवतो....

## शंभर दिवस शेळीचं जीवन जगण्यापेक्षा एक दिवस वाघाचा जीवन जगा...





**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

शिवसेना (उबाठा) चे उद्धव ठाकरे यांची आज बुलढाणा जिल्ह्यामध्ये सिंदखेड राजा आणि मेहकर येथे जनसंवाद सभा पार पडत आहे .त्याकरता ते सर्वप्रथम मातृ तीर्थ सिंदखेड राजा येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी महा जिजाऊ चे अभिवादन केल्यानंतर राजवाड्याला भेट दिल्यानंतर थेट सभासद भोसले त्यांच्या समवेत खासदार संजय राऊत अंबादास दानवे व नरेंद्र खेडेकर, जालिंदर बुधवंत, जिजा राठोड उपस्थित होते.. यावेळेस त्यांनी थेट नरेंद्र मोदी व अमित शहा यांचा आपल्या भाषणातून समाचार घेत अशा वृत्तीला गाढून टाकण्याची भाषा केली.यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या खतावरच्या मोदींच्या फोटोकडे आपला मोर्चा वळवला व त्यावर त्यांनी ज्या खात्याच्या पोत्यामध्ये शेणखत आहे त्यावर देखील मोदींचा फोटो हा किती हास्य होत आहे असं ते म्हणाले. आमच्या सरकार आल्यानंतर हा शेतकऱ्यांच्या हातावरचा मोदींचा फोटो आणि काढून टाकू असे ते म्हणाले.पुढे बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले की, काही जण असे आहेत ज्यांना इडी, सीबीआयच्या नोटिसा आल्या आणि ते लगेच शेपटा घालून भाजपात गेले. भाजप आज जे काही करत आहे ती औरंगजेबी वृत्ती आहे. फोडा तोडा आणि राज्य करा ही भाजपची वृत्ती आहे. रोज रोज त्यांच्या पक्षात ते कचरा गोळा करत आहे असा टोला उध्दव ठाकरे यानी लगावला.. नाव न घेता इथल्या गदार खासदाराला किती वेळ खासदार करायचं? पहिले आमदार केलं, मग खासदार केलं, इथल्या हिंदुत्ववादी मतदारांनी तीनवेळेस खासदार केलं, तरीही गद्दारी केली. आता या वेळेला गद्दारखासदाराच डिपॉझिट जप्त करून दाखवतो असे उध्दव ठाकरे म्हणाले. ४० वर्ष होऊनदेखील सूर्याजी , खंडोजी यांच्या कपाळावरील गद्दारीचा टीळापुसल्या गेल्या नाही मग या गद्दारांच्या कपाळावरील गद्दारीचा टीळा कसा पुसल्या जाईल असा सवाल यावेळी उध्दव ठाकरे यांनी केला.देशात इंडीया आघाडीचं सरकार येणार असल्याचा विश्वास हीयावेळी उध्दव ठाकरे यांनी बोलून दाखवला.अबकी बार ४०० पार नाही तर अबरकी बार भाजपा तडीपार हा नारा गावागावात जाऊद्या असे ठाकरे म्हणाले. आमचं हिंदुत्व हे राष्ट्रीयत्वआहे असे ते म्हणाले.तुमची मुले बाळ स्वातंत्र्यात जगली पाहिजेत की गुलामात है ठरवाअसेही ठाकरे म्हणाले. हकुमशाहीला गाडण्याचे आवाहन शेवटी उध्दव ठाकरे यांनी केले. महाराष्ट्रात ठाकरेंची त्यांना इतकी भीती वाटत आहे की आता आमचे सगे सोयरांना देखील ते सोबत घेत असल्याचं राज ठाकरे यांचं नाव घेता समाचार घेतला.

तसंच कोरोना काळात मी मुख्यमंत्री असताना तुम्ही माझं ऐकलं तोंडाला मास्क आणि नियम पाळले तसं यावेळेस सरकार गाढून टाकण्याकरता देखील माझा ऐका असं भावनिक आव्हान उद्धव ठाकरे यांनी उपस्थित जनसमुदायाला केलं.

## गळ्याला टोकदार वस्तूने टोचल्याने १२ बकऱ्यांचा मृत्यू

**जनसंचलन/मोताळा**

एका अज्ञाताने १४ ज बकऱ्यांच्या गळ्याला टोकदार वस्तूने ळी टोचल्याने त्यापैकी १२ बकऱ्यांचा मृत्यू ८३ झाल्याची घटना तालखेड येथे २० मार्च बत रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास थ उघडकीस आली असून यामध्ये ८० कर हजारांचे नुकसान झाले आहे. व्या याप्रकरणी तक्रारीवरून बोराखेडी बत पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहेज्ञानेश्वर हरी चोपडे यांनी बोराखेडी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचे चुलत भाऊ प्रमोद निवृत्ती चोपडे यांचे गावशिवारात शेतात शेड असून त्या शेडमधील १४ बकऱ्यांच्या गळ्याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने टोकदार वस्तूने टोचून जखमी केले. त्यापैकी १२ बकऱ्यांचा मृत्यू झाला. ही घटना २० मार्च रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास उघडकीस आली असून यामध्ये चुलत भावाचे अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

**आजही बलदेवराव चोपडे माजी जिल्हा परिषद सभापती नांदुरा यांनी बदलत्या काळातही शिवकालीन पद्धत जोपासली. त्यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नानिमित्त अतिशय सुंदर पद्धतीने लग्नाची पत्रिका बुलडाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष यांना देऊन आमंत्रित केले.**



## लोकसभा लढून जनसेवा करणार संदीप शेळके यांचा पत्रकारांसोबत संवाद...

**जनसंचलन/ लोणार**

वन बुलडाणा मिशन च्या माध्यमातून जिल्हा भरात संपर्क अभियान राबवून लोकसभा निवडणूक लढण्याची तयारी करणारे राजर्षी शाहू परिवाराचे सर्वेसर्वा संदीप शेळके यांनी आज लोणार येथील वन बुलढाणा मिशन च्या कार्यालयात पत्रकारांसोबत संवाद साधून आपल्या राजकीय वाटचालीसंदर्भात विविध प्रश्नाना दिलखुलास उत्तरे दिली. येणारी लोकसभा निर्भीडपणे आणि पूर्ण ताकदी निशी लढून खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासपर्व आणणार असल्याचे सुद्धा त्यांनी ठणकावून सांगितले. तालुक्यातील पत्रकार मंडळी नी शहरातील तसेच ग्रामीण भागातील विविध प्रश्न विचारून त्या संदर्भात संदीप शेळके यांचे काय व्हिजन असेल याबाबत संवाद साधण्याबरोबरच विविध राजकीय प्रश्न सुद्धा संदीप शेळके यांना विचारले , सद्या तरी आपण अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात असून विविध राजकीय पक्ष आपल्यासोबत संपर्क करण्याचा प्रयत्न करीत आहेत पण माझी व्यक्तिशः कोणत्याही पक्षाच्या बड्या नेत्या सोबत उमेदवारी बाबतीत चर्चा झाली नसल्याचे सुद्धा त्यांनी सांगितले पण सद्याच्या राजकीय परिस्थिती बघता राजकारनात काहीही होऊ शकते असे सूचक विधान सुद्धा त्यांनी यावेळी केले . आपण जनतेचा उमेदवार म्हणून लोकसभा मैदानात उतरत असून निवडणुक लढण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे त्यामुळे समोर कोणताही उमेदवार असला तरी आपला निश्चय पक्का आहे असे सुद्धा त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थिती बाबत सांगितले, तसेच सध्या आपला जिल्हा विकासाच्या बाबतीत




अंत्यन्त मागास जिल्हा मानला जातो ही मागास पणाची ओळख पूसण्यात विद्यमान लोकप्रतिनिधी गेल्या ३५वर्षात यशस्वी झाले नाही त्यामुळे निश्चितच या निवडणूकित विकासाच्या मुद्द्यावर जनता मतदान करणार असल्याचा ठाम विश्वास आपल्याला असल्याचे प्रतिपादन सुद्धा त्यांनी यावेळी केले. या पत्रकार परिषदेला वन बुलडाणा मिशन चे लोणार तालुक्यातील कार्यकर्ते तसेच तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बीसीए,बीबीए, बीएमएस या पदवी प्रवेशासाठीही सीईटी परीक्षा घेतली जाणार...

**जनसंचलन/खामगाव**

खामगाव राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षातर्फ (सीईटी सेल) येत्या २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेसाठी व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन ( बीसीए) या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात येणार आहे. या परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमबीए), संगणक उपयोजन पदव्युत्तर पदवी (एमसीए) या व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस हे पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला आहे. सीईटी सेलकडून अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी घेण्यात येते. या पार्श्वभूमीवर आता बीसीए, बीबीए, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही आता प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया होणार आहे. सीईटी परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सीईटी सेलकडून लवकरच सुरू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या परीक्षेचे वेळापत्रक आणि माहिती सीईटी सेलच्या वेबसाइटवर लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सीईटी सेलने दिली.

# शाळेतील शिक्षकाने तर हद्दच केली, चक्क परीक्षा केंद्रावरच दारू पिऊन घातला धिंगाणा


**जनसंचलन/ जळगाव जामोद**





गेल्या काही दिवसापासून संपुर्ण महाराष्ट्रसह राज्यात दहावी बोर्ड परिक्षा सुरु आहेत त्यातच बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद. तालुक्यातील पिंपळगाव काळे गावातील ङ्गसरस्वतीफ आश्रम शाळेत १५ मार्च ला दहावीच्या बोर्डाचा पेपर सुरु होता. सरस्वती आश्रम शाळेचे मुख्याध्यापक रमेश रेवस्कार तथा केंद्र संचालक यांनी पोलीस स्टेशन मध्ये शिक्षक रामराव डाखोरे वय वर्षे ४० या शिक्षकांनी शाळेत मध्ये दारू पिऊन धिंगाणा घातल्यामुळे जळगाव जामोद पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली व त्यांच्यावर कलम ८५ (१) मदाका नुसार गुन्हा दाखल झाला. याचा पुढील तपास ठाणेदार महाजन सह पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित हे तपास करीत आहे.

# रानडुक्कर आडवे आले दुचाकीस्वाराचा मृत्यू

**जनसंचलन/ खामगाव**



रानडुक्कर आडवे आल्यान झालेल्या अपघातात एक दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटन - मंगळवारी रात्री १९ मार्च रोजी घडली. प्राप्त माहितीनुसार, खामगाव - तालुक्यातील कवडगाव येथील ममराज झामसिंग राठोड मंगळवारी सायंकाळी दुचाकी क्र. एमएच - २८- बीपी-०८४८ ने गिरोली येथून कवडगाव येथे जाब होते. दरम्यान, पिंपळगाव नाव गावाजवळ अचानक रानडुक्क दुचाकीच्या आडवे आले. य रानडुकराला वाचविण्याच्या प्रयत्नान राठोड दुचाकीवरून खाली पडले त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी श्यामराव झामसिंग राठोड यांनी पिंपळगाव राजा पोलिस स्टेशनला बुधवारी तक्रार दिली. या तक्रारीवरून पिंपळगाव राजा पोलिसांनी मृताविरोधात भादंवि कलम ३०४ (अ) नुसार गुन्हा दाखल - केला. या घटनेचा तपास पिंपळगाव राजा पोलिस करीत आहेत. दरम्यान नळगंगा धरण परिसर, ज्ञानगंगा अभयारण्यालगतच्या पट्टयातही ही रानडुकरांचे प्रमाण अधिक असून या भागातही यापूर्वी रानडुकरांमुळे दुर्घटना झाल्या आहेत.




# सतीश पवारांच्या रुपात लोकसभेसाठी समोर येतोय चेहरा...

## निवडून आणण्याचाही जनमनाकडून होतोय दावा

**जनसंचलन/बुलडाणा**

समाजकारण करताना राजकारणात उतरून अवघे वर्ष झाले. या काळात एक अभ्यासू आणि लढाऊ बाण्याने शासन, प्रशासनाकडून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी धडपडणारे व्यक्तिमत्व म्हणून सतीश पवार यांची जिल्हाभरात ख्याती झाली आहे. तरुण तडफदार, होतकरू, सलग जनसेवेत वाहून घेणारे एक उमदे नेतृत्व त्यांच्या रुपात उदयास आल्याने सतीश पवार लोकसभेसाठी लोकाभिमुख चेहरा ठरू लागले आहेत.

जिल्हावासीयांच्या भल्यासाठी, सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने दादा, तुम्ही आता लढाच! असा खास आग्रह सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्यांसह व्यापारी आणि नोकरदारांकडूनही होत असल्याची चर्चा जिल्हाभर आहे. सोशल मीडियावर सतीश पवार खासदारकी लढणार आणि जिंकणार, अशा पोस्ट फिरू लागल्याने विरोधकांपुढे नवा पेचप्रसंग उद्भवल्याचे बोलले जात आहे. वंचित बहुजन युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा सतीश पवार यांच्यावर राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर आणि युवा नेते सुजात आंबेडकर यांनी सोपविली. जेमतेम वर्षभरापूर्वी सोपविलेल्या जबाबदारीचे भान ठेवत या पदाला अगदी प्रामाणिकपणे न्याय देण्याची भूमिका त्यांनी निभावल्याचे त्यांच्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध झाले आहे. जनसामान्यांनादेखील आपण तोच न्याय मिळवून देऊ ही जनभावना मनी बाळगून सतीश पवार आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटवत असल्याचे जिल्हावासियांनी गतवर्षभरात विविध प्रकारची आंदोलने आणि त्यातून मार्गी लागलेल्या प्रश्नांमधून अनुभवले. सामाजिक कार्यात नेहमीच झोकून देऊन काम करणारे सतीश पवार यांनी आपल्या कार्यकुशलतेने जनतेच्या मनाचा ठाव घेतला. आपले तुणतुणे वाजविणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांना आपल्या खास स्टाइलने वठणीवर आणून जनतेला न्याय दिला. हाती कोणतीही सत्ता सुत्रे नसताना हा कार्यकर्ता एवढ्या ताकदीने पुढे जात आहे, मग तो लोकसभेत गेला तर जिल्हावासियांना निश्चितच फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा ठेवत सतीशदादा, तुम्ही लोकसभा लढवाच, निवडून आणण्याची जबाबदारी आमची, असा निर्धार करत जनतेने त्यांच्याकडे खासदारकीची निवडणूक लढण्याचा रेटा धरला असून, तशी चर्चा होत आहे. ज्या जात प्रवर्गातून ते येतात, त्या प्रवर्गाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने ती मते निर्णायक ठरू शकतात, हीदेखील चर्चा यानिमित्ताने होत आहे.

एकीकडे महाविकास आघाडी व वंचितच्या युतीचा विषय चर्चेचा ठरत असताना जिल्ह्यामध्ये मात्र समाज माध्यमावर सतीश पवार यांच्या खासदारकीच्या चर्चेला उधाण आल्याचे दिसत आहे. सतीश पवार यांची जिल्ह्यामध्ये एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळख आहे. जिल्ह्यातील विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न मांडणारा एकमेव नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांसाठी काढलेला एल्गार मोर्चा, ठिय्या आंदोलने, टॉवर आंदोलन तसेच शासन आपल्या दारी कार्यक्रमात दिलेले विद्यार्थ्यांचे एक लाख स्वाक्षऱ्यांचे निवेदन हे युवा



वर्गाला विशेष भावले. तसेच अनेक वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित असलेल्या हजारो प्रकरणांसंदर्भात त्यांनी केलेले आंदोलन हे कक्षेबाहेरचे असल्याने लोकांच्या कायम स्मरणात राहिले. त्यांच्या आंदोलनाची न्यायालयाने दखल घेत न्यायाधीशांची रिक्तपदे भरण्यात आली. जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांवर केलेली निलंबनाची अन्यायकारक कारवाई मागे घ्यायला प्रशासनाला भाग पाडले. या आंदोलनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या मनात सतीश पवार यांच्याबद्दल आदराचे एक वेगळे स्थान निर्माण झाले. सतीश पवार एक गरीब कुटुंबातील कार्यकर्ता आहेत. त्यांना कुठलाही राजकीय वारसा नाही. केवळ आपल्या स्वकर्तृत्वाने त्यांनी एक दमदार नेता म्हणून आपली छाप पाडली आहे. राजकीय काम करत असताना सामाजिक कार्यातदेखील सतीश पवार हे जिल्हाभरात सदैव अग्रेसर असतात. त्यांच्या नेतृत्वात बुलढाण्यामध्ये काही दिवसांपूर्वी विविध देशातील भिक्खूंच्या उपस्थितीमध्ये जागतिक धम्म परिषद पार पडली. या धम्म परिषदेची इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झाली. त्यांची शिस्त आणि नियोजनबद्धता ही कायमच लोकांच्या मनावर कोरली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजकीय जोर-बैठका, जागावाटपाबाबत महाविकास आघाडीची आज बैठक...



वृत्तसंस्था/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, राजकीय बैठकांचा जोर वाढला आहे. महाविकास आघाडीच्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात असून, आज, गुरुवारच्या बैठकीत जागावाटप सूत्रावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन महायुतीत सहभागाचे स्पष्ट संकेत दिलेल्या राज ठाकरे यांच्या मनसेचीही आज बैठक होणार आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने गेल्या शनिवारी लोकसभा निवडणुकांच्या वेळापत्रकाची घोषणा केली. मात्र, अद्याप महाविकास आघाडीसह महायुतीचे जागावाटप निश्चित झालेले नाही. त्यामुळे राज्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांची दिल्लीवारी सुरू असून, जागावाटपाचे सूत्र निश्चित करण्यासाठी सर्वांची लगीनघाई सुरू आहे. त्यातच महाराष्ट्र नवनिर्माण सेना लवकरच महायुतीत सामील होणार असल्याने राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असल्याने आता महायुतीच्या जागावाटपाबरोबरच महाविकास आघाडीच्या जागावाटपाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांकडून जागावाटपाबाबत कोणत्याही प्रकारचे हेव्-ोदावे नसल्याचा दावा केला जात असला तरी रखडलेल्या जागावाटपामागे बहुतांश पक्षनेते व कार्यकर्ते यांचे समाधान न होणे, हेच प्रमुख कारण आहे. आता महाविकास आघाडीने जागावाटप अंतिम करण्यासाठी आज, २१ मार्चचा मुहूर्त निवडला आहे. या बैठकीत अंतिम चर्चा केली जाणार असून, त्यानंतर जागावाटप जाहीर केले जाणार आहे. त्यामुळेच या जागावाटपात वंचित बहुजन आघाडीला किती जागा देण्यात येतात, याबाबतही तर्कवितर्क लढवले जात आहेत. या बैठकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे शरद पवार, काँग्रेसचे नाना पटोले आणि बाळासाहेब थोरात उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जाते.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याने ते महायुतीत सामील होणार असल्याचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर मनसेतर्फे गुरुवारी शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत मनसेच्या राज्यभरातील नेतेमंडळींसह पक्षातील सर्व सरचिटणीसांना आमंत्रित करण्यात आले आहे. या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीच्या रणनीतीसह पक्षाच्या गुढीपाडव्याचा मेळाव्याबाबत चर्चा होणार असल्याचे समजते.

# मनसे भाजप युती, राज ठाकरेंच्या भूमिकेनं ठाकरेसेनेला धोका किती? शिंदेंची आणखी गोची?



वृत्तसंस्था/मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुतीत जाणार असल्याचं जवळपास स्पष्ट झालं आहे. मनसे प्रमुख राज ठाकरेंनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची काल दिल्लीत बैठक घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये ४० मिनिटं चर्चा झाली. ही बैठक सकारात्मक झाल्याचं मनसेकडून सांगण्यात आलं आहे. त्यामुळे महायुतीला आणखी एक भिडू मिळणार असल्याचं निश्चित झालं आहे. दक्षिण मुंबई मतदारसंघाचे विद्यमान खासदार अरविंद सावंत शिवसेनेतील पक्षफुटीनंतर ठाकरेंसोबत राहिले. इथे भाजप, शिवसेनेचा खासदार नसल्यानं ही जागा मनसेला सोडण्यात फारशी अडचण नसेल. गेल्या महिन्याभरापासून या मतदारसंघात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर सक्रिय झाले आहेत. त्यांना तिकीट दिलं जाईल अशी चर्चा आहे. पण मनसे महायुतीत आल्यास त्यांच्यासाठी हा मतदारसंघ सोडला जाऊ शकतो. राज यांनी शहांकडे दोन जागांची मागणी केली. त्यावर एक जागा निश्चितपणे देऊ शकतो. पण दुसरी जागा देणं कठीण असल्याचं शहांनी राज यांना स्पष्टपणे सांगितलं. राज यांना महायुतीकडून दक्षिण मुंबई मतदारसंघ सोडला जाऊ शकतो. हा मतदारसंघ मनसेला मिळाल्यास इथून बाळा नांदगावकर यांना उमेदवारी मिळू शकते. नांदगावकर शिवडीचे माजी आमदार आहेत.बाळा नांदगावकर राज यांचे निकटवर्तीय मानले जा-तात. त्यांना तिकीट दिल्यास मनसे, भाजप, शिवसेनेची ताकद त्यांच्यामागे असेल. या परिस्थितीत ठाकरेंच्या शिलेदारासाठी निवडणूक आव्हानात्मक असेल. सध्याच्या घडीला मुंबईत ठाकरेंचा एकच खासदार असेल. तो मनसेकडून पराभूत झाल्यास उद्धव यांच्यासाठी मोठी नामुष्की असेल. मनसेला आतापर्यंत लोकसभा निवडणुकीत यश मिळालेलं नाही.दक्षिण मुंबईनंतर राज ठाकरे नाशिकसाठी आग्रही असल्याचं कळतं. इथले विद्यमान खासदार शिंदे गटात आहेत. हेमंत गोडसे २०१४ पासून नाशिकचं लोकसभेत प्रतिनिधीत्व करतात. विशेष म्हणजे गोडसे आधी मनसेतच होते. २००९ मध्ये त्यांनी लोकसभा निवडणूक लढवली होती. त्यांनी राष्ट्रवादीच्या समीर भुजबळांना चांगली लढत दिली. पण त्यांचा २२ हजार मतांनी पराभव झाला. त्यानंतर गोडसे सेनेत आले. २०१४, २०१९ ची निवडणूक त्यांनी जिंकली.नाशिकमध्ये राज यांची चांगली ताकद आहे. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेनं राज्यात १३ जागा जिंकल्या. त्यातील ३ जागा नाशिकमधील होती. विशेष म्हणजे तिन्ही जागा शहरातील होत्या. २०१२ मध्ये मनसेनं नाशिक महापालिकेची सत्ता मिळवली. त्यामुळे राज नाशिकसाठी आग्रही आहेत.नाशिक मतदारसंघ शिंदेंच्या सेनेकडे आहे. इथले विद्यमान खासदार हेमंत गोडसे शिंदेंसोबत आहेत. त्यामुळे शिंदे हा मतदारसंघ सोडण्याची शक्यता कमीच आहे. हा मतदारसंघ मनसेला दिला गेल्यास तो शिंदेंसाठी धक्का असेल. गोडसे यांच्याबद्दल लोकांमध्ये नाराजी असल्याचे अहवाल आहेत. त्यामुळे नाशकात उमेदवार बदला, अशा सूचना भाजपकडून शिंदेंना देण्यात आल्या आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958